## रयत शिक्षण संस्थेचे

# छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

## कमवा व शिका योजना

## सन २०१९-२०

कमवा व शिका योजना ही छत्रपती शिवाजी कॉलेजची मातृसंस्था असून महाविद्यालयाची सुरुवात या योजनेच्या माध्यमातून झालेली आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजासाठी शैक्षणिक आणि सामाजिक, आर्थिक सुधारणा व्हावी याकरिता या अभिनव योजनेची सुरुवात केली व आजमितीला ही योजना भारतातील इतर शैक्षणिक संस्थाना मार्गदर्शक ठरलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या व समाजातील त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यात शिक्षणाच्या सुविधा प्राप्त करून दिल्या जात आहेत. या योजनेत देशातील  सर्व राज्यातील, सर्व जिल्हयातील विविध जाती धर्मातील मुलांना प्रवेश दिला जातो. या सर्वाना एकत्रितरीत्या या योजनेच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. सन **२०१९-२०** या शैक्षणिक वर्षात या योजनेत एकूण **४५** विद्यार्थी व **२६** विद्यार्थीनिनी (एकूण- **७१**) प्रवेश घेतलेला आहे. या शैक्षणिक वर्षात या योजनेत असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल १०० टक्के आहे. दरवर्षी कर्मवीर जयंती, बैलपोळा, रक्षाबंधन, शिवजयंती इ. कार्यक्रम उत्साहाने  साजरे केले जातात.

महाविद्यालयातील कमवा व शिका योजनेच्या विद्यार्थ्यांनी गत शैक्षणिक वर्षात ४ एकर ऊस, तसेच भेंडी, शेवगा, वांगी, मेथी, शापू, चाकवत, तांदळी, पोकळा, कोथिंबीर, गवार, पालक, मुळा, कोबी, फ्लॉवर, कारले, वालघेवडा, पावटा, लसूण, राजगीरा, मिरची, बीट, कांदा, दोडका टोमॅटो, चंदन बटवा,   इ. भाजीपाला उत्पादन घेतले  तसेच खोडवा ऊसामध्ये आंतरपीक म्हणून तीन एकर काकडीची लागवड केली होती. **भाजीपाल्यातून यावर्षी २,१८,६३२/- रुपयांचे व काकडीतून ६२००३ /- रुपयांचे**  उत्पन्न मिळाले. यावर्षी १ एकर क्षेत्रात तागाची लागवड

करण्यात आली तसेच १५ गुंठे क्षेत्रात देशी (८५) व टिशू कल्चर (30) केळीची लागवड व (१५) पपईची लागवड केली आहे. कमवा व शिका योजनेच्या सर्व क्षेत्रावरील बांधावर शेवगा व गोल्डन शिताफळाची लागवड करण्यात आली आहे. यावर्षी ½ एकर क्षेत्रात बियाण्यासाठी ऊस लागवड केली असून 4 एकर खोड़वा ऊस आहे. त्या सर्व क्षेत्राला ठिबक सिंचन करण्यात आले आहे. या **ऊस क्षेत्रातून यावर्षी १०४.६४२ टन ऊसाचे उत्पादन निघाले. त्यातून २,८६,०००/- रुपयांचे** उत्पन्न मिळाले. गतवर्षी आंबा विक्रीतुन **३७,७८५/-** रुपयांचे उत्पन्न निघाले. मुलांच्या मजूरीच्या माध्यमातून **३२,०३५/** रुपये मिळाले॰ शेतीतील विहिरिमध्ये चार आड़वी बोअर घेण्यात आली त्या चारीही बोअरला भरपूर पाणी लागले आहे. यावर्षी शेतीला पूरक गांडुळखत प्रकल्प उभारण्यात आला आहे. तसेच मुख्य गेटपासून शेडपर्यंत मुरमाचा एक ते दीड फुटाचा थर टाकून रस्ता तयार करण्यात आला आहे॰

**शेती फार्म न. २** मध्ये फुलशेती व शेवगा यांची लागवड केली आहे. यावर्षी शेवगा, फुले व फळे विक्रीतून **३७,०७७/-** रुपयांचे उत्पन्न निघाले. यंदा या फार्ममध्ये **९३** पेरुच्या झाड़ाची व (५९) लिबू लागवड करण्यात आली आहे.

**चेअरमन**

**कमवा व शिका योजना**